पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. २५
वर्ष ८ वे, अंक १४ वा
किंमत १ रुपया
६ नोव्हेंबर १९९१

# शेतकरी संघटक

# शेतकरी आंदोलनाचे उद्दिष्ट

— शरद जोशी

शेतीमालाला भाव मिळवायचा म्हणजे आम्ही सरकारकडे पदर पसरून जातो असे नव्हे. यात केंद्रीकरणालाही मदत करत नाही. आजच्या परिस्थितीमध्ये भाव मागतो याची पार्श्वभूमी अशी आहे की दुष्काळाच्या काळामध्ये तीस वर्षे नुकसान सोसून आम्ही सरकारला धान्य दिलेले आहे. त्याअर्थी शासनाने शेतीमालाच्या किंमती या केवळ मागणी–पुरवठ्याच्या तत्त्वाने ठरत नाही, त्याला काहीतरी Regulatory price mechanism किंवा Public utility price mechanism आहे असे गृहित धरले आहे असे मी समजतो. आमची मागणी अशी की ह्याच कारणाकरिता शासनाने भाव बांधून द्यावेत, असे आम्ही समजतो.

जगातील बहुतेक सर्व विकसित देशात, शेतीमालाला अनुदान नाही असा एकही देश राहिलेला नाही. तेव्हा नवीन औद्योगिकरणाकडे जाणाऱ्या देशांमध्ये जर आर्थिक आणि मुद्रेची समतोलता राखायची असेल तर शेतीमालाला अनुदान हे आवश्यक समजावे हे एक गृहिततत्त्व आहे. परंतु मी सतत म्हणत असल्याप्रमाणे शेतकरी संघटनेचा विचार शेतकऱ्याला पैसे मिळवून द्यावे हा नाही; तर शेतकऱ्याला ताठ मानेने, अभिमानाने जगता यावे हा त्यामागचा एक तात्त्विक विचार आहे. जर आपण शासनाकडे दर वेळा भीक मागायला जाणार असलो तर, ह्या विचाराचा नाश होणार नाही का? भाव बांधून घेताना दोन गोष्टी महत्त्वाच्या. दुष्काळामध्ये तुम्ही आमच्याकडून सक्तीने कमी भावाने धान्य नेलेत, म्हणून मुबलकतेच्या काळामध्ये निदान उत्पादनखर्च भरून येईल असे भाव मिळतील अशी व्यवस्था करणे हे शासनाचे काम आहे असे आम्ही समजतो. पण जर का शासन असे म्हणत असेल की किती दिवस शेतकऱ्याला भीक घालायची, तर माझे म्हणणे असे आहे की शेतकऱ्यांनी असे सांगायला पाहिजे की तुम्हाला जर आमचा माल विकत घ्यायचा नसेल, जर आधारभूत किंमती तुम्हाला द्यायच्या नसतील तर मग निदान खुल्या बाजारपेठेचे तत्त्व जरी तुम्ही संपूर्णतः मान्य करा. कोणते तरी एक तत्त्व मान्य करा. जर तुटवडा असेल तर नियंत्रण आणि मुबलकता असेल तर खुली बाजारपेठ, असे खेळ चालणार नाहीत. जर कृषिमालाला खुली बाजारपेठ द्यायचे तत्त्व कबूल केलेत तर आज मी ते स्वीकारायला तयार होईन. दोन अटी स्पष्ट आहेत. पहिली अट अशी की पुन्हा कधी या देशात दुष्काळ पडला तर आमच्याकडून लेव्ही मिळायची नाही. बाजारपेठेतील भावानेच तुम्हाला आमच्याकडून धान्य घ्यावे लागेल. व दुसरी

## बदल की पुढचे पाऊल?

**शेतकरी संघटनेचे नवीन पर्व सुरू होणार काय, होणार असल्यास त्याचे स्वरूप काय असणार, नवीन पर्वातील कार्यक्रम शेतकरी संघटनेने आतापर्यंत जो आर्थिक विचार मांडला त्याला धरून असेल की नाही इत्यादि अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या व शेतकरी कार्यकर्त्यांच्या मनात आज आहेत. १० नोव्हेंबर १९९१ रोजी शेगाव येथे शेतकरी संघटनेचा वार्षिक मेळावा भरणार आहे. 'वार्षिक' असे विशेषण धारण करणारा हा पहिलाच मेळावा आहे. या मेळाव्यात शेतकरी संघटनेच्या पुढील कार्यक्रमांची घोषणा होणार अशी सर्व शेतकरी वाट पाहात आहेत.**

**आळंदीच्या बैठकीतील ठराव शेतकरी संघटनेच्या मूळ आर्थिक विचाराशी सुसंगत आहेत किंवा नाहीत हे ठरवायचे झाल्यास शेतकरी संघटनेचे सुरुवातीपासूनचे सर्व साहित्य अभ्यासणे जरूरीचे आहे.**

**येथे जो मजकूर पुनर्प्रकाशित करीत आहे तो आहे 'भारतीय शेतीची पराधीनता' या पुस्तिकेतील. ही पुस्तिका जानेवारी १९८१ मध्ये वर्धा येथे झालेल्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरातील चर्चेवर आधारलेले आहे.**

**नवीन पर्वाची घोषणा झालीच तर ती मूळ विचाराशी सुसंगत आहे किंवा नाही हे तपासण्यास शेतकरी कार्यकर्त्यांना हा मजकूर मार्गदर्शन ठरेल असा विश्वास आहे.**

**— संपादक**

अट अशी की खुली बाजारपेठ ही खरोखरीच खुली असायला हवी.

आज कांदा, कापूस, साखर, भुईमूग या सगळ्या गोष्टी परदेशात अत्यंत किफायतशीर दराने निर्यात करणे शक्य आहे. साखरेची आंतरराष्ट्रीय किंमत ८॥ ते ९ रु. आहे. कपाशीचा खर्च आम्हाला इथे ७०० रु. भरून देत नाहीत; परंतु निर्यातीवरती मात्र नियंत्रण ठेवले आहे. कांद्याला किलोला ५५-६० पैसे मिळत नाहीत म्हणून आंदोलने करावी लागतात. निर्यातीत १.९० पर्यंत मिळू शकतात. ८॥ रु. ने भुईमुगाची २५० कोटींची मागणी आत्ता माझ्याजवळ आहे. नाशिक जिल्ह्यात ज्वारी ६५ पै. किलो आहे. तीच मध्यपूर्वेत कोंबड्यांच्या खाद्यासाठी २.३० रु. ने वाटेल तेवढी निर्यात करता येईल.

मात्र खुली बाजारपेठेत पूर्ण खुली असायला हवी. Imperial preferance प्रमाणे 'इंडियन प्रेफरन्सचे' धोरण आखले गेले आहे, तेही सोडावे लागेल. यापैकी कोणताही पर्याय सरकारने निवडावा. त्याच्याबद्दल मी मत द्यायला तयार नाही. कारण मी जर म्हटले की हाच पर्याय योग्य तर टीकाकार लगेच म्हणतील हे समाजवादी आहेत, किंवा साम्यवादी आहेत! मी जर म्हटले की खुली बाजारपेठ हवी तर हे म्हणणार मी भांडवलशाहीवादी आहे. कोणतीही पद्धत निवडा. पण ओली किंवा सुकी; दोन्ही वेळी फक्त शेतकरी मरणार, ही तऱ्हा काढून टाका.

उत्पादनखर्च भरून निघण्याचे पर्याय तीन :

१) मालाच्या साठवणुकीची व्यवस्था करणे. एकाच वेळी सगळा माल शेतातून निघतो, बाजारात एकदम येतो, म्हणून भाव पडतात. त्याची साठवणूक करणे, त्याच्यावरती बँकांकडून उचल मिळविणे.

२) जी काही आपली पारंपरिक पिके आहेत, ती कमी करणे. त्याच्याऐवजी नवीन प्रकारची पिके घेणे.

३) तयार केलेला माल कच्च्या स्वरूपात बाजारात न नेता, त्यावर प्रक्रिया करणे.

संपूर्ण नियंत्रण आणि खुली बाजारपेठ याच्यामध्येही एक मार्ग आहे – ज्याला मी Safety-fuse-mechanism म्हणतो. दाब जास्त झाला की आधीच व्यवस्था करून ठेवून पाणी वाहून जाईल अशी व्यवस्था करायची. पूर्णपणे शासनावर अवलंबून राहायची आमची इच्छा नाही. तीन मार्गांनी शेतकऱ्याला भाव मिळविता येतील.

१) संपूर्ण नियंत्रणाची पद्धत.

२) खुल्या बाजारपेठेची पद्धत.

३) सरकारने आवश्यक तेव्हाच बाजारात येण्याची पद्धत.

या तीनही पद्धतींनी शेतकऱ्याला न्याय मिळू शकेल. न्याय मिळणं हा महत्त्वाचा मुद्दा आहे. एकाधिकार कापूस खरेदी ही पहिली पद्धत. दुसरी पद्धत म्हणजे संपूर्ण नियंत्रणे काढून टाका. शेतकऱ्याला जेथे जास्त भाव मिळेल तेथे तो माल विकेल. आवश्यक वाटेल तर निर्यात करेल. आणि तिसरी पद्धत अशी की शासनाने असे सांगावे की शेतकऱ्यांनी बाजारात त्यांना मिळेल तो भाव घ्यावा, पण उत्पादनखर्चाच्या सीमेखाली भाव जाणार नाही, याची हमी आम्ही घेतो. शेतकऱ्याला बाजारपेठेत जो अनुभव येतो, त्यावरून कोणती पद्धत सोयीस्कर वाटणे शक्य आहे? याचा विचार करा. नाफेडचा अनुभव व शेतकऱ्याच्या यातनाही लक्षात घ्या.

त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाची गोष्ट : जर सरकारने ठराविक किंमतीला माल विकत घ्यावा अशी आपली अपेक्षा असेल – तर एक धोक्याचा दिवा दाखवून ठेवतो. आम्ही उत्पादन करू तेवढा सर्व कांदा, कपाशी आम्ही सांगू त्या भावाने विकत घ्यायलाच हवा अशी मागणी आज चालून जाते, उद्याही चालून जाईल, पण फार दिवस चालणार नाही. जेव्हा आपण किंमतीवर नियंत्रणाची भाषा करतो तेव्हा आपोआपच एकूण होणाऱ्या उत्पादनावरील नियंत्रणाची कल्पना आपण मान्य करतो. तुम्ही कितीही कांदा काढा आम्ही तो विकत घेऊ, हे कोणत्याही शासनाला शक्य होणार नाही. कॅलिफोर्नियात मोसंब्याला जर मोठा बहर आला तर स्प्रे करून ठराविक मोसमात तो मोहोर पाडून टाकावा लागतो. कारण शासन जेव्हा त्या भावाची हमी देते, त्यावेळी तुम्ही असे नाही म्हणू शकत नाही तुम्ही फक्त एवढाच कांदा विकत घ्या, बाकीचा आमचा आम्ही विकू. हे चालणार नाही. तुम्ही, आमचे आम्ही बघून घेऊ म्हटले, म्हणजे तुम्ही तो कांदा खाजगी रितीने बाजारात नेणार आहे मग बाजारातील किंमत खाली येणार. तेव्हा तो माल शेतामध्ये तयारच होता कामा नये अशा तऱ्हेचेसुद्धा उत्पादनावरील नियंत्रण, नियंत्रित किंमतींच्या मागणीबरोबर येते, हे लक्षात घ्या.

शेतकऱ्याच्या शेतमालाला जर रास्त भाव मिळायचा असेल तर साठवणूक, त्यावरील उचल आणि प्रक्रिया या तीनही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या आहेत. आणि शेवटी भाव याच पद्धतींनी मिळणार आहे. पण आज प्रक्रियेचे कारखाने काढण्याची तुमची ताकत किती आहे? आणि तुमच्यापुढचा प्रश्न किती लाख खेड्यांचा आहे? त्यासाठी किती भांडवलसंचय लागेल? तो कसा करणार? भाव वाढल्याखेरीज भांडवलसंचय नाही आणि त्याशिवाय उद्योगधंदे नाहीत आणि उद्योगधंदे झाल्याखेरीज भाववाढ नाही अशा दुष्टचक्रात आपण सापडतो. हे चक्र आपल्याला फोडायचे आहे. ते आपण रास्त भावाच्या मागणीने फोडतो आहोत. प्रक्रियेचे कारखाने अवश्य काढायला हवेत. उलट मी जेव्हा असे म्हणतो की शेतीमालाला भाव वाढवून देणं हा एक कलमी कार्यक्रम नसून ही बहुगुणी गुटी आहे आणि या लहानशा गोळीमध्ये सर्वांगीण विकासाची बीजे आहेत, त्याचा अर्थ हाच आहे.

दीर्घ मुदतीत शेतमालाला भाव मिळाल्याचे दोन महत्त्वाचे परिणाम होतील. उदा. गेल्या वर्षी पहिल्यांदा चाकणला कांद्याला भाव बांधून दिले गेले; ताबडतोब खाजगी शेतकऱ्यांनी आपल्या गहाणवट जमिनी सोडवून घेतल्या. आणि मला असा आत्मविश्वास वाटतो की दोन ते तीन वर्षांच्या आत चाकणच्या परिसरात नुसतीच लाल मिरची बाजारात पाठवायच्या ऐवजी निदान तिची भुकटी करून प्लॅस्टिकच्या पिशवीत भरून देण्याचे कारखाने चालू होतील. तेलाच्या गिरण्याही निघतील. असे अनेक पदार्थ आहेत. पुणे-मुंबई जवळ आहे. इंडियातल्या लोकांना ज्या काही चैनीच्या वस्तू

लागतात त्या पुरवणे फायद्याचे आहे. आज ते होऊ शकत नाही. दीर्घ मुदतीत भारतातील परिस्थितीला योग्य असे औद्योगिकरण होणार आहे. कारण त्यावेळी द्रव्यसंचय हा ग्रामीण भागात वाढू लागेल. हे जोपर्यंत होत नाही. तोपर्यंत शासनाकडून घेतलेले पैसे, बँकांकडून घेतलेले कर्जे यांच्या आधारावर ज्या संस्था चालू होतात, त्यांच्यामध्ये पैशावर हात मारणाऱ्यांचीच भाऊगर्दी जमते. हा धोका लक्षात घेऊन आपली कार्यकर्त्यांची जी मर्यादित शक्ती आहे ती आपण या कार्यात किती लावायची हा फक्त पर्यायाचा आणि निवड करण्याचा प्रश्न आहे. म्हणजेच आजच कुठे तरी कॅपिटल इन्व्हेस्टमेन्ट चालू व्हायला हवी. यासाठी भाव मिळविणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट ठरते.

विषय निघालाच आहे म्हणून याच स्वरूपातील पुढचा मुद्दा मांडून ठेवतो.

अर्थशास्त्राचे जे विद्यार्थी आहेत, त्यांना हे माहिती आहे की वेगवेगळ्या काळी किंवा ठराविक काळानंतर येणाऱ्या आर्थिक संकटांवरती, अरिष्टांवरती अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेली जी उपाययोजना आहे, तिचा उपयोग विकासासाठी होत नाही, हे सर्वमान्य आहे. त्यामुळे फक्त चलनफुगवटा होतो. परंतु प्रत्यक्षात त्याच तत्त्वांचा उपयोग करून विकासाच्या कार्यक्रमाकरिता, केन्सचे तत्त्व, शेतीमालाला भाव मिळवून देणार आहे. जेथे ग्रामीण भागात पैसा खेळू लागतो आणि त्यामुळे भांडवलसंचय तेथल्या तेथेच राहिल्यामुळे औद्यागिकरण होऊ शकते. त्याहूनही एक मोठा परिणाम म्हणजे आज इंडियातील उद्योगधंदे – जे केवळ लहानशा बाजारपेठेवर अवलंबून आहेत – मर्यादित उत्पादन करावे आणि उत्पादनाच्या प्रत्येक घटकावर जास्तीत जास्त फायदा घ्यावा – त्यातून हाय कॉस्ट इकॉनॉमी तयार झाली आहे. त्याच्याऐवजी जर लो कॉस्ट इकॉनॉमी तयार करायची असेल तर त्याला चांगला मार्ग म्हणजे 'भारताच्या' बाजारपेठेतील गरजांचे रूपांतर मागणीत करायचे.

●●●

# शेतकरी संघटकचे आजीव वर्गणीदार

## गेल्या महिन्याभरात नोंदविलेले

१२. शेतकरी सह. संघ लि., कोल्हापूर
१३. बी. जे. इंग्रोले आणि कं., कोल्हापूर
१४. श्री. उत्तमराव रंभाजी वाबळे, उमरा (परभणी)
१५. डॉ. अ. ना. पातुरकर, हिंगोली (परभणी)
१६. श्री. त्र्यंबकराव रोडगे, जांबरून (बु.) (परभणी)
१७. श्री. आनंदराव सोनूने, कहाकर (बु.) (परभणी)
१८. श्री. जयपाल सि. फराटे, मु. पो. मौजे डिग्रज (सांगली)
१९. श्री. साहेबराव पाटील, मु. पो. शिवर, (यवतमाळ)
२०. श्री. मोहनराव जाधव, मु. पो. बारभाई (यवतमाळ)
२१. श्री. नूरसिंग मनिराम नाईक, मु. पो. चिंचबर्डी (यवतमाळ)
२२. श्री. मोहन मायाजी जाधव, मु. पो. सुभाषनगर (सदोबा सावळी) (यवतमाळ)
२३. श्री. भूपेंद्र ऊर्फ बाळासाहेब शिंदे, मु. पो. सावळी सदोबा (यवतमाळ)
२४. श्री. जनार्दन मनवर, मु. पो. बेलोरा (यवतमाळ)
२५. श्री. कृष्णा धोटे, मु. पो. कुऱ्हा (यवतमाळ)
२६. डोमाजी मुनेश्वर, मु.पो. वरूड भक्त (जि. यवतमाळ)
२७. श्री. दिलीप बेंदरे, मु. पो. पळशी (जि. यवतमाळ)
२८. श्री. इकबाल मालाणी, मु. पो. केळझरा (जि. यवतमाळ)
२९. श्री. सुरेश देव्हारे, मु. पो. कवठा (विरूळ) (यवतमाळ)
३०. सौ. पार्वतीबाई ज्ञानेश्वर वाघमारे, मु. पो. वाघेडा (वर्धा)
३१. सौ. सत्यभामा शिवराव शेळके, मु. पो. वाघेडा (वर्धा)
३२. सौ. सुनंदाताई हरिश्चंद्र जामुनकर, मु. पो. वाघेडा (वर्धा)
३३. सौ. निलीमा केजाजी अराडे, मु. पो. वाघेडा जि. वर्धा
३४. सौ. चंदाताई मारोती मून, मु. बोडखा (वर्धा)
३५. सौ. वर्षा सुभाषराव कडू, मु. बोडखा (वर्धा)
३६. सौ. वीणाताई अजयराव राऊत, मु. सावरखेडा (वर्धा)
३७. सौ. संध्या तुकाराम थुटे, मु. सावरखेडा (वर्धा)
३८. सौ. माया केशवराव भोळे, मु. पो. वायगाव (हळद्या) (वर्धा)
३९. सौ. बेबीताई शंकरराव धुमडे, मु. पो. वायगाव (हळद्या) (वर्धा)
४०. सौ. इंदिराताई ग. धुमडे, मु. पो. वायगाव (हळद्या) (वर्धा)
४१. सौ. आशाताई शंकराव हरणे, मु. पो. शेगाव कुंड (वर्धा)
४२. सौ. लता प्रकाश वाकडे, मु. पो. वाघेडा (वर्धा)
४३. सौ. छबूताई ज. जंगलू खोडे, मु. काचनगाव (वर्धा)
४४. सौ. विठाबाई बापूराव अवचट, मु. काचनगाव (वर्धा)
४५. सौ. सुरेखा बबन माडुरे, मु. काचनगाव (वर्धा)
४६. सौ. चंद्रकला गुणवंता घवघवे, मु. काचनगाव (वर्धा)

**भीक नको, घेऊ घामाचे दाम**

# नाव बुनकरांचे, नफा नसली वाडीयांचा!!

**— विजय जावंधिया, वायफड (वर्धा)**

इंडीयन कॉटन मिल्स फेडरेशनचे अध्यक्ष श्री. नसली वाडीया ह्यांनी महाराष्ट्र राज्यातली कापूस एकाधिकार योजना रद्द करावी व केन्द्र सरकारचे कापूस महामंडळ (C.C.I.) बरखास्त करावे अशी अशी सूचना केली आहे. या विषयावर चर्चा सुरू असतानाच केन्द्र सरकारने कापसाच्या निर्यातीवर तर बंदी जाहीर केलीच परतु यंदा सुतनिर्यात बंद करण्याची घोषणा केली आहे. हा काही योगायोग नाही तर योजनाबद्ध पद्धतीने कापसाचे भाव पाडण्यासाठी उचललेले एक एक पाऊल आहे. श्री. नसली वाडीया फक्त महाराष्ट्रातील कापूस एकाधिकार योजनेच्या विरोधातच बोलले अशी मानसिकता शेतकऱ्यांची होवू नये तर कापसाचे भाव पाडण्यासाठी इतर कारस्थाने काय काय होतात हे समजवून घेणे अत्यंत जरूरीचे आहे. हे समजवून घेतले तर कापूस एकाधिकार योजनेला १९८५-८६ साली ३०८ कोटी रु. तोटा व १९९०-९१ ला २०६ कोटी रु. नफा का होतो ह्याचे उत्तर श्री. बाबासाहेब धाबेकरांना सांगता येईल. ८५-८६ साली व ९०-९१ साली कापूस एकाधिकार योजनेचे अध्यक्ष श्री. बाबासाहेब केदार होते. व्यक्ती एकच मग ८५-८६ ला विक्रमी तोटा व ९०-९१ ला विक्रमी नफा असे कसे? देशातील व आन्तरराष्ट्रीय बाजारातील रूईचे व सरकीचे भावात मंदी आली तर त्याचा कापूस एकाधिकार योजनेच्या अंतिम किंमतीवर परिणाम होतो. नूतन अध्यक्ष श्री. बाबासाहेब धाबेकर, हे तथ्य नाकारतील का? कापूस उत्पादकांना यंदा आकर्षक भाव मिळण्याची परिस्थिती निसर्ग व जागतिक बाजारपेठ, यामुळे निर्माण झाली आहे. श्री. नसली वाडीया ह्यांनी कापूस एकाधिकार योजनेचा विरोध केला म्हणून त्याच्यावर तुटून पडायचे व आमच्या अस्मितेला आवाहन केले म्हणून तलवारी चालवायच्या. परंतु या संघटित शक्तीची तलवार जर योग्य प्रकारे वापरली नाही तर ती फक्त हवाच कापत राहील व शेतकऱ्यांना कापणारे कापसाचे भाव पाडण्यात यशस्वी होतील. गेली १९ वर्ष महाराष्ट्रातील कापूस एकाधिकार योजना, इतर कापूस उत्पादक राज्ये, गुजरात, आंध्र, तामीळनाडू, कर्नाटक, म. प्र. पंजाब, हरीयाणा, राजस्थान, का स्वीकारत नाही? महाराष्ट्रात देशातील कापसाच्या उत्पादनापैकी १५ ते २० टक्के कापूस पिकतो, हे विसरून चालणार नाही.

श्री. नसली वाडीया ह्यांनी फक्त कापूस एकाधिकार योजना बंद करावी अशी मागणी केलेली नाही तर त्यांनी केन्द्रीय कापूस महामंडळाची (C.C.I.) खरेदी बंद करण्याची मागणी केली आहे. याच सोबत त्यांनी २ लक्ष गांठी कापसाच्या आयातीची मागणी केली होती. गिरणी मालकांची आयातीची मागणी सरकारने मान्य केली नाही, परंतु त्या दबावामुळे निर्यात बंद करण्यात आली आहे १९८९-९० साली १४ लक्ष गांठी व १९९०-९१ साठी १२ लक्ष गांठीची निर्यात करण्यात आली होती. ९१-९२ च्या हंगामात निर्यात कोटा जाहीर करण्यात आला नाही याचा अर्थ १०-१२ लक्ष गांठी देशाच्या बाजारपेठेत जास्त उपलब्ध राहतील. सुताची निर्यात बंद करण्यात आली आहे. ६ ते १० लक्ष गांठी रूई चे सुत निर्यात करण्यात येत होते. १९८७ साली ८६० लाख किलो, १९८८ ला ४३० लाख किलो, तर १९८९ ला ५४० लाख किलो सुताची निर्यात झाली होती. थोडक्यात, कापसाची व सुताची निर्यात बंद केल्यामुळे देशाच्या बाजारपेठेत सुमारे २० लाख गांठीची उपलब्धता वाढणार. सर्वसामान्यांना समजावे म्हणून हे स्पष्टीकरण आकडेवारीने करू या – ९१-९२ च्या हंगामात असा अंदाज आहे की १२५ लाख गांठीचे उत्पादन होणार आहे. त्यापैकी १२ लाख गांठी रूई व ८ लाख गांठीचे सुत निर्यात केले तर देशात १०५ लक्ष गांठी कापूस एकाधिकार योजना – ८ ते १० लक्ष गांठी केन्द्रीय कापूस महामंडळ (C.C.I.) व १०५ लक्ष गांठी खाजगी व्यापारी अशी वर्गवारी करता येईल. आज आन्तरराष्ट्रीय बाजारात १४००० ते १५००० रु. प्रती खंडीचा भाव आहे. १० लक्ष गांठी निर्यातीचा कोटा जाहीर झाला असता तर केन्द्रीय कापूस महामंडळाने (C.C.I.) म. प्र., आंध्र, पंजाब, हरीयाणा, गुजरात, या राज्यात प्रामुख्याने १४०० ते १५०० रु. प्रती क्विंटल प्रमाणे कापसाची खरेदी केली असती व जास्तीत जास्त कापसाच्या निर्यात कोट्याची मागणी केली असती. कारण निर्यात कोटा जाहीर करताना प्रत्येक राज्याच्या उत्पादनाच्या टक्केवारी प्रमाणे तो करावा लागतो. (समजा, १० लाख गांठी निर्यात करावयाच्या आहेत तर त्यात महाराष्ट्राचा वाटा १.५० ते २ लाख गांठी) श्री. नसली वाडीया सी.सी.आय्. ची खरेदी बंद करा असे का म्हणतात, हे यावरून स्पष्ट होईल. १९८८ साली गिरणी मालकांनी सी.सी.आय्. ने फक्त आधारभूत किंमतीतच कापूस खरेदी करावा अशी मागणी केली होती. कृषि मूल्य आयोगाने जाहीर केलेली कापसाची आधारभुत किंमत (Support price) शेतकऱ्यांना परवडणारी नाही याबद्दल कुणाचेही दुमत नाही.

### नाव बुनकरांचे नफा गिरणी मालकांचा

या सर्व पार्श्वभूमीवर कापूस बाजारपेठेचा गंभीरपणे अभ्यास करण्याची गरज आहे.

आज सरकीचे भाव ६०० ते ७०० रु. क्विंटल आहेत. केन्द्र सरकारने ९१-९२ च्या हंगामासाठी जाहीर केलेले कापसाचे भाव ७५० ते ८४० रु. प्रती क्विंटलचे आहेत, तर बाजारात १४०० ते २००० रु. प्रति क्विंटलचे भाव आहेत. म्हणजेच जवळपास आधारभूत भावापेक्षा १०० टक्के भाव जास्त

आहेत. कापसाचे भाव वाढले म्हणून सुताचे भाव वाढले व त्यामुळे बुनकरांवर बेकारीचे संकट कोसळले असा दबाव गिरणी मालकांनी उभा केला. ही त्यांची नेहमीची पद्धत आहे. कापड मंत्री इंदिरा काँग्रेसचे श्री. रामनिवास मिर्धा असोत की जनता दलाचे श्री. शरद यादव. त्यांच्याशी चर्चा करताना, कापूस निर्यात केला तर "सुत के दाम बढ़ेंगे तो बूनकर भाई का क्या होगा?" हा मुद्दा चर्चेचा गाभा असायचा. मी त्यांना नेहमी एकच विनंती केली व आजच्या कापड राज्यमंत्री श्री. अशोक गहलोत ह्यांनाही आहे की हातमाग बुनकर बांधवांना किती गांठी सुताच्या लागतात? ज्या ५-१० लाख गांठी रूईची गरज असेल ती त्यांना सबसीडी देवून पुरी करावी परंतु त्याकरीता गिरणीमालकांना १०० लक्ष गांठी स्वस्तात लाटण्याची संधी का उपलब्ध करून द्यावी? कापसाची व सुताची निर्यात बंद करण्याचे हे राजकारण बदलत नाही म्हणून आन्तरराष्ट्रीय बाजारातील तेजीचा लाभ कापूस उत्पादकांना मिळत नाही.

### कापसाचे भाव व राजकारण

गोऱ्या इंग्रजांच्या काळापासून कापूस उत्पादकांची लूट करण्याचे धोरण आहे. कापूस स्वस्त व कापड महाग हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. ८७ ते ९१ याच काळातील कापसाचे भाव – उत्पादन व निर्यात याचा अभ्यास केला तर कापसाचे भाव राजकारण या संबंधात स्पष्ट चित्र उभे राहील. १९८७-८८ ची कापूस एकाधिकार योजनेची संकरीत – ४ कापसाची अंतिम किंमत ९१३ रु. प्रती क्विं. ची होती. १९८८-८९ व १९८९-९० ची अंतिम किंमत अजून जाहीर झालेली नाही. परंतु शेतकऱ्यांना मिळालेली किंमत ८८-८९ ला संकरीत – ४ ला ७३० रु. व ८९-९० ला ८४० रु. विशेष म्हणजे ८९-९० च्या हंगामात शेतकऱ्यांबद्दल विशेष प्रेम आहे. असा भास निर्माण करणारे श्री. राजासाहेबांचे सरकार होते व १४ लक्ष गांठीची निर्यात झाली. या वर्षी १३५ लक्ष गांठीचे विक्रमी उत्पादन झाले होते. जागतिक बाजारपेठेत १००० ते १५०० रु. खंडी जास्त भाव होते तरी निर्यातीची परवानगी देताना "कोटा परमीट" पद्धतीचा अवलंब केला गेला व गिरणीमालकांना आन्तरराष्ट्रीय बाजारपेठेपेक्षा स्वस्त किंमतीत कापूस उपलब्ध करून देण्यात आला. शेतकऱ्यांचे नशीच की ९०-९१ च्या हंगामात फक्त ११७ लक्ष गांठीचे उत्पादन झाले व सरकारने १२ लक्ष गांठीची निर्यात केली. चन्द्रशेखर सरकारने १८ लक्ष गांठी निर्यात केल्या. निसर्गाने कमी उत्पादन, म्हणून तेजी आली व अंतरराष्ट्रीय स्तरावर भाव आले असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी हेही समजून घेतले पाहिजे. की आज अन्तरराष्ट्रीय बाजारपेठेत तेजी नसती तर गिरणी मालकांनी कापसाची आयात करून भाव पाडले असते. आज ही गिरणी मालकांना कापडाच्या निर्यातीसाठी कापसाची आयात करण्याची सूट आहे. (Import against Export Under O.G.L.) परंतु आन्तरराष्ट्रीय बाजारपेठेत ७२ सेंट प्रती पाउंडचा भाव म्हणजे जवळपास ४० रु. किलो रुई होते. यापेक्षा देशी बाजारपेठेत स्वस्त आहे व ती जास्तीत जास्त पाडण्याचे कारस्थान सुरू आहे. १९७८ साली एकाच वर्षात १२ लक्ष गांठी केन्द्रीय कापूस महामंडळाच्या माध्यमातून आयात करून ती रूई गिरणी मालकांना २० टक्के सवलत देवून उपलब्ध करून देण्यात आली होती – यामुळे कापसाचे भाव पडले व मिलमालकांनी आयात केलेली रुई वापरलीच नाही व त्यापैकी ३ लाख गांठी पुनः निर्यात करावी लागली व या सर्व व्यवहारात जवळपास ७२ कोटी रु. तोटा कापूस महामंडळाला (C.C.I.) झाला.

कापसाची निर्यात बंद करण्याची घोषणा झाली तेव्हा एकाही सहकारी सूत गिरणीच्या अध्यक्षांनी या निर्णयाचा विरोध केला नाही. परंतु सुताची निर्यात बंद करताच इंदिरा काँग्रेसचे माजी आमदार व सहकार महर्षि श्री. भास्करराव शिंगणे ह्यांनी या निर्णयाविरोधात कडक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी आपल्याच पक्षाच्या सरकारने साखरेची निर्यात बंद करून दाखवावी असे आवाहन देवून साखर लॉबी चा दबाव सरकारवर आहे ह्याची पावतीच दिली आहे. साखर निर्यात करताना भाव फरकातली ५० टक्के सबसीडी केन्द्र सरकारने दिली होती. थोडक्यात निसर्गाने संप केला नसता, अन्तरराष्ट्रीय बाजारात ७२ सेंट ऐवजी ८५-८६ साली असलेला ३२ सेंट रूईचा भाव असता तर कापूस उत्पादकांची काय अवस्था झाली असती? कापूस उत्पादकांच्या विरोध ातले धोरणात्मक निर्णय बदलवून घेण्यासाठी संघटीत जागरूक शक्तीची गरज आहे.

●●●

# अध्यक्षांचा दौरा संपन्न

शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. किशोर माथनकर यांनी गेल्या दीड महिन्यात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा दौरा करून कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या. शेगावच्या मेळाव्याच्या दृष्टीने आळंदी बैठकीतील ठरावांची चर्चा करणे व शेतकरी संघटनेच्या पुढील बांधणीसाठी निधीसंकलन, लक्ष्मीमुक्ती, संघटक वर्गणीदार नोंदणी इत्यादी कार्यक्रमांची चर्चा करणे असे दोन प्रमुख उद्देश या दौऱ्यामागे होते. अध्यक्षांबरोबर या दौऱ्यात शेतकरी महिला आघाडी अध्यक्ष सौ. सुमनताई अग्रवाल, माजी अध्यक्ष श्री. शंकर धोंडगे व वेगवेगळ्या जिल्ह्यात त्या त्या विभागातील प्रमुख कार्यकर्त्यांनीही भाग घेतला.

●●●

**☎ ५४ नव्हे २३५४**

**श्री. शरद जोशींच्या आंबेठाण येथील अंगारमळ्यातील फोन क्रमांकात बदल झाला आहे.**

**बदललेला क्रमांक : चाकण २३५४**

# राष्ट्रीय संपत्ती संभाळणारा शेतकरी

**शेतकरी – श्री. भिमराव हावगीराव तोंडारे मु. पो. देवर्जन ता. उदगीर जि. लातूर यांची मुलाखत बाबुराव हाडोळे व चामले सरपंच यांनी दि. २५-९-९१ रोजी घेतली.**

आम्ही दोघे सकाळी तोंडारे यांच्या शेतात जावून सर्व पीकपाणी पाहिले. घरी येवून त्यांच्याशी मुलाखत घ्यावे म्हणून प्रश्नरूपात बोलण्यास सुरुवात केली. नाव, गांव, वय, शेतीचा अनुभव असे प्रश्न विचारले असता ते म्हणतात, ‘आरं बाबा असं मास्तरानं इचारल्यावनी का बरं इचारतावं, निट इचारा! बाबु तुला का माझं नावं, गांव माहीत नाही? माझं वय असंल ७० ते ७५ वरीस.’

त्यांना १५ एकर जमीन, घरी लहान मोठे तेरा मानसाचे कुटुंब, पैकी मोठ्या मुलास व तिसऱ्या मुलास लिहिता वाचता येते. दुसरा कंपणीत नोकरीस व चौथा १० वी शिकतो. स्वतः दोघेही आडाणी आहेत. लहानमोठी १५ जनावरे असून दोन बैल, म्हसी व गायी. कांही दुभती आहेत. शेती जुन्या पद्धतीने करतात. ती सुद्धा कोरडवाहू आहे. गावात त्यांना आम्ही मामा (भिमराव मामा) म्हणतो.

प्रश्न – मामा तुम्ही गावरानी व सरकारी खतं किती व कसे वापरता?

उत्तर – अजून तसंच इचारताव? बरं ऐक बाबू. मला हे सरकारी खत कळतबी नाही, माहीतबी नाही, अन् शेतात आनलोबी नाही. घरात जनावरं-ढोरं बकळ हायत. १५ ते २० बैलगाड्या खात निघतंय. वर्साला दोन टूकडे भरत्यात. अन् बाजावर (चारपाईवर) चाळून काढताव. पोते भरून ठिवतावं. पाऊस पडलं की तिफणीच्या मागी बियाबराबर पेरताव. त्येच्यापाई रानबी चागलं.

प्रश्न – मामा, सरकारी खत (रासायनिक खत) का वापरत नाही?

उत्तर – पेरणीला आकड राहतंय, आपल्याकड पैसे राहतनीत. सावकार याज लई घेत्यात. सरकारी करज (बँक कर्ज) जल्दीनं टाइमावर मिळतनी, तवा रिन काढून सण करू ने वाटतंय.

प्रश्न – मामा समजा तुम्हाला वेळेवर कर्ज पुरवठा केल्या?

उत्तर – हे बघा, सरकारी खातं घतलो तर चार पोते जास्त निघतील. मागा मोलाचा खात, खात आनुन घालायचा खर्च, करजाचं याज लई वाढलय मनून, रास केल्याबराबर माल बाजारात आणाव लागतं. तेच्यान भाव कमी येतंय. मग तेच याजबी फिटतनी. मग असला उदारीचा सण काय कामाचा. आंगाला पचत नाही...

प्रश्न – पिकावर रोगराई पडल्यास कोणकोणते औषधे वापरता?

उत्तर – आरे बाबा! ही साडीसाती घरात कस्याला अनू. कठाळ येवून रागं रागं औषध पिवून मरायला का?

प्रश्न – औषध न फवारल्याने उत्पादन कमी येते व नुकसान होते.

उत्तर – सरकारी खतासारखंच की, खर्चा लई येतेय, व्याजबी फिटतनी. औषीध फवरल्याल गुळी भूस जनावर खातनीत हे सगळ्याचा आनुभव. काहीजनानी माझ्यापासून वैरण नेले, त्यांची खायनात औषध मारलंय मननू.

प्रश्न – तुम्ही नवीन सुधारीत बियाणे वापरता का?

उत्तर – तेला काय काय मनत्यात ते मला माहीतबी नाही. मी जुनेच बी पेरताव. पिवळा, मल्ला झिंग्री, भुईमूग, साळ, मुग, उडीद, आंबाडी, रब्बीला करडी, गहू, हरभरा, जवस, कारळ असे जुनेच. आता चार वरीस झालं, पोरं माझं ऐकनावनी. सरकारी हाब्रीट जवारी तेवढी पेरतात.

प्रश्न – मामा नवीन बियाने, रासायनिक खते, औषधे न वापरल्यामुळे उत्पादन कमी होते मग हा सगळा व्यवहार व कुटुंब कसा भागवीता?

उत्तर – हे बघ बाबू, माझ्या घरचं असलं काय बी इचारनूक लावलचक. माझ्या घरचे वासे मोजतूस का?

प्रश्न – तसं नाही मामा तुमची माहीत ”आपल्या शरद जोशी“ला पाठवायची आहे. मी तुमच्या पोरासारख विचारलो.

उत्तर – तसं नाही रे बाबू, हामी जुने मानसं राग येतंय. तुझ्या शरद जोश्याला सांगायचं असलं तर सांग की. बघ सगळं शेतातलं हाय. मिठ, घासलेट तेल, आन् कापडं तेवढं आनव लागतंय. कडबा, गुळीभुस चांगलं. त्येच्यानं जनावरं चांगलं. दुध -दुभतं भरपूर खातो. (दूध, तुप, ताक, दही, लोणी) त्येचानं शरीर बिनडंकी, रोगराई कसलीच नाही. धान्य सुद्धा बगर फवारणीचं. गळीताचे धान्यामुळे तेल, पेडं, आंबाडा, मिळतो. आबाड्यामुळं दोर दोरखंड बकळ मिळते. घरात कोणीबी वेसनी नाही. (बिडी, तबाखु, सिगरेट, सुपारी) घरी चहा सुद्धा नाही. सोयरे आले तर दुध देतो व उन्हाळ्यात ताक पितो. त्येचाने पोटात थंड राहतेय. घरातलं कोणीबी दवाखाण्याला गेलं नाही. लई झालं तर सर्दी, पडस, ताप, खोकला असलंच कवातर येतंय. तवा कावळीच्या मुळ्याचा काढा पिताव, सद्या आमी सुखात हाव. आमाला कोणाचबी देणं नाही. येणं नाही. हाय तेचाच समाधान मानतो. पाऊस लई झाला आन् थोडा पडला

**(पान ७ पहा)**

**रासायनिक खते व औषधे हे देशाला वरदान नसून शाप आहेत.**

# लक्ष्मीमुक्ती : ग्रामगौरव समारंभ
# श्री. शरद जोशींचा विदर्भ दौरा

१९ ते २३ ऑक्टोबर १९९१ या दिवसांत श्री. शरद जोशी यांनी विदर्भातील यवतमाळ, वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यांचा दौरा करून त्या जिल्ह्यातील ज्या गावांनी शेतकरी संघटना आणि शेतकरी महिला आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने चालू केलेल्या लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाचा स्वीकार करून आपापल्या गावातील गृहलक्ष्मींच्या नावे शेतजमिनीचा हिस्सा करून त्यांना संपत्ती अधिकाराने सन्मानीत केले त्या गावांचा गौरव केला.

या दौऱ्यात गौरवसमारंभ होऊन सन्मानपत्र मिळविलेल्या गावांची यादी.

| गाव तालुका | संपत्ती अधिकारप्राप्त महिलांची संख्या |
|---|---|
| **जिल्हा यवतमाळ** | |
| सोनवाढोणा ता. नेर | १२७ |
| जवळगाव ता. नेर | ९०/१२० |
| चिचगाव ता. नेर | १०१ |
| धनज माणिकवाडा ता. नेर | १०३ |
| वटफळी ता. नेरपरसोपंत | १०३ |
| सावळीसदोबा ता. घाटंजी | १२७ |
| **जिल्हा वर्धा** | |
| इंझाळा ता. देवळी | १४८ |
| मुरदगाव खोसे ता. देवळी | १०१ |
| काचनगाव ता. हिंगणघाट | १०४ |
| छोटी आर्वी ता. हिंगणघाट | ११४ |
| पवनी | १११ |
| बोपापूर | ६१ |
| हिवरा | ४३ |
| आजंती | ८९ |
| शेगाव (कुंड) ता. हिंगणघाट | ११० |
| वाघेडा ता. समुद्रपूर | १०० |
| सावरखेडा ता. समुद्रपूर | १०० |
| बोडखा ता. समुद्रपूर | ४५ |
| वायगाव (हळद्या) ता. समुद्रपूर | १०८ |
| **जिल्हा चंद्रपूर** | |
| वाकली ता. चिमूर | १५८ |
| चिंचोली (सिंगरू) | ४५/६० पैकी |
| चिकमोह | ५७/६५ पैकी |
| **जिल्हा नाशिक** | |
| विठेवाडी ता. कळवण | |

●●●

## नाशिक जिल्ह्यात शरद जोशी

शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी २५ ऑक्टोबर १९९१ रोजी नाशिक जिल्ह्यास भेट देऊन सटाणा येथे नाशिक, जळगाव व धुळे जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. कार्यकर्ता बैठकीनंतर कळवण तालुक्यातील विठेवाडी या गावी जाऊन त्यांनी गावाने 'लक्ष्मीमुक्ती' कार्यक्रम अमलात आणाल्याबद्दल गावाला सन्मानपत्र दिले. अंतसमय जवळ आला असतानासुद्धा शेतकरी संघटनेची चिंता वाहणारे संघटनेचे जेष्ठ पाईक कै. कृष्णा दोधू यांच्या पुतळ्याचे अनावरण कार्यक्रमाच्या सुरूवातीला श्री. शरद जोशींच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचा आदर्श पुढे ठेवून नाशिक जिल्ह्यात लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम आता जोमाने सुरू होईल असा आशावाद श्री. शरद जोशींनी व्यक्त केला.

## प्रक्रियातंत्र प्रशिक्षण शिबीर

नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात फक्त शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकर्त्या भगिनींसाठी शेतीमालप्रक्रियातंत्र व नैसर्गिक शेती यासंबंधी एक शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. शेतीमाल- प्रक्रियेसंबंधी अनुभव व स्वारस्य असलेल्या कार्यकर्त्या भगिनींनी आपली नावे संपूर्ण पत्त्यासहीत कळवावी. शिबिराचे निमंत्रण वेगळे येईल.

(पान ६ वरून)

तर सालचंदी तेवढी होत्याय. हे रे संघटन्याचं कवा होणाराय.

तुम्ही शेगावला या म्हणजे होईल असे म्हणून घरी सर्व मंडळी होती दुध पिवून बाहेर पडलो. व या सर्व विचारावर पून्हा विचार करून आमचा निष्कर्ष असा निघतो.

राष्ट्रीय संपती सांभाळणारा खरा शेतकरी हा. कारण आम्ही बऱ्याच जनाची शेती पाहीली. पण तोंडारे याच्या शेतात जसं पिक आहे. तसं दुसरीकडे नाही. रासायनिक खते वापरणाराचे पिक मोडून खाली पडले आहे. पण याचे पिक खडी व शितळ आहे. रासानिक खतामुळे जमीन कडक होते, जमीनीतील पोत नष्ट होते. शरीराला लागनारे सोळा अन्नघटक मिळत नाहीत. जमीन नापिक होते. दारूड्याला दारूचे जसे व्यसन लागते तसेच रासायनिक खताशिवाय पिकत नाही. धान्य निकृष्ट दर्जाचे. संकरीत धान्य अल्पवयीन व हलक्या प्रतीचे त्यामुळे शरीरास मिळणारे अन्नघटक भरपूर मिळत नाही. शेणखतात संपूर्ण अन्नघटक असतात. त्यामुळे जमीनीतील अन्नघटकात भर पडते. पिक चांगले व निरोगी येते. (उदा. दसऱ्या दिवसी) घटस्थापना जे करतो त्यावेळी शेतीतील काळीमाती आनुन त्यात रब्बीचे धान्य टाकतो. म्हणजेच ती शेतकऱ्याची प्रयोगशाळा आहे. त्याच वेळी आपण माती परिक्षण करून कोणत्या रानात कोणते बी पेरावे ते ठरवतो. म्हणजे आपण किती कुशल आहे ते समजते.

●●●

## प्रतिज्ञा

*मी शपथ घेतो की शेतकऱ्याचे लाचारीचे जिणे संपवून त्याला देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने व सुखाने जगता यावे याकरिता 'शेतीमालाला रास्त भाव' या एककलमी कार्यक्रमासाठी संघटनेचा पाईक म्हणून मी सर्व शक्तीने प्रयत्न करीन.*

*या प्रयत्नात पक्ष, धर्म, जात, वा इतर कोणत्याही भेदाभेदांचा अडथळा येऊ देणार नाही.*

**शेतकरी हुतात्म्यांना विनम्र अभिवादन.**

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th November, 1991

To

PNCW 281

Licence to post without prepayment **No. 87**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
November 6, 1991

cqMkyk ‘bafN
nqÆVlagkj
cGhjkT; ;srls
vkuanouHqo

# वार्षिक मेळावा

## शेतकरी हुतात्मा स्मृतीदिनी
## १० नोव्हेंबर १९९१ रोजी
## शेगाव जि. बुलढाणा

***शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो,***
***नव्या युगाचे नवे आव्हान स्वीकारण्यासाठी***
***मोठ्या संख्येने मेळाव्यास या.***

**राष्ट्रीय कृषिनीती**
*मराठी आवृतीचे प्रकाशन १० नोव्हेंबर १९९१ रोजी शेगाव येथील मेळाव्यात.*
मूल्य रु. दहा मात्र


| | | |
|---|---|---|
| **पाक्षिक शेतकरी संघटक**<br>मालक – मोहन बिहारीलाल परदेशी<br>मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण | संपादक, मुद्रक, प्रकाशक<br>सुरेशचंद्र म्हात्रे | ६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.<br>प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता<br>११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५. |